# बिट्स पिलानीतर्फे मुंबईत 'बिट्स लॉ स्कूल'

**प्रतिनिधी**

पणजी

भारत सरकारच्या 'इन्स्टिट्यूशन ऑफ एमिनेन्स' चा दर्जा प्राप्त करणाऱ्या विद्यापीठांपैकी एक असलेल्या बिट्स पिलानीने बृहन्मुंबईत बिट्स लॉ स्कूलच्या माध्यमातून कायदेविषयक शिक्षण सुरू करत असल्याची घोषणा केली. या संपूर्ण शिक्षणाला मजबूत डिजिटल आधार देण्यात आला आहे. कायदेविषयक शिक्षणासाठी संस्थेने शिष्यवृत्तीचीही सोय केली आहे. बिट्स लॉ स्कूल बी.ए.एल.एल.बी. (ऑनर्स) आणि बी. बी. ए. एल. एल. बी. (ऑनर्स) हे दोन अत्यंत लोकप्रिय पाच वर्षांचे एकात्मिक पदवी अभ्यासक्रम सुरु करत आहेत. पहिले शैक्षणिक वर्ष एक ऑगस्ट २०२३ पासून सुरू होईल आणि प्रवेश मार्च २०२३ पासून सुरू होणार आहे.

यावेळी बिट्स पिलानीचे कुलपती कुमार मंगलम बिर्ला म्हणाले, की एक समान, वैविध्यपूर्ण आणि सर्वसमावेशक ज्ञान अर्थव्यवस्था म्हणून भारताचा उदय होण्यासाठी आमचे विद्यापीठ आणि विशेष शिक्षण केंद्र हातभार लावेल. सल्लागार समितीच्या काही सन्माननीय सदस्यांमध्ये न्यायमूर्ती यू. यू. ललित (प्रख्यात कायदेतज्ज्ञ आणि भारताचे माजी सरन्यायाधीश), न्यायमूर्ती बी. एन. श्रीकृष्ण (प्रख्यात कायदेतज्ज्ञ आणि भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश), पल्लवी श्रॉफ (व्यवस्थापकीय भागीदार, शार्दुल अमरचंद मंगलदास अँड कंपनी), आणि हैग्रेव खेतान (व्यवस्थापकीय भागीदार, खेतान अँड कंपनी). प्रोफेसर (डॉ.) आशिष भारद्वाज बिट्स् लॉ स्कूलचे संस्थापक डीन म्हणून सहभागी झाले आहेत. संस्थापक डीन प्राध्यापक (डॉ.) आशिष भारद्वाज म्हणाले, 'कायदा शिकण्याची ओढ असलेले, शैक्षणिक संशोधनाच्या सीमा आणखी पुढे नेण्याची इच्छा असलेले आणि वेळेवर न्याय मिळवून देण्यासाठी नैतिक विश्वाचा चाप वापरण्याच्या आमच्या धोरणांवर विश्वास असलेल्या विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना बिट्स लॉ स्कूल सामावून घेईल. जगातील ५५ देशात कार्यरत असलेल्या बिट्स पिलानीच्या एक लाख ७० हजारांपेक्षा अधिक माजी विद्यार्थ्यांच्या नेटवर्कमध्ये या स्कूलच्या विद्यार्थ्यांना सामावून घेत त्यांना नानाविध लाभ मिळतील. नेते, संस्थापक, उद्योजक, विचारवंतांचे सर्वात मजबूत आणि चमकदार असे हे नेटवर्क आहे.

पवईतील हिरानंदानी गार्डन्समधील अत्याधुनिक हंगामी कॅम्पसमधून ऑगस्ट २०२३ पासून त्यांचे पहिले शैक्षणिक वर्ष सुरू होत आहे. प्रवेशात विविधता आणि सक्षमता टिकवून ठेवण्यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. लॉ स्कूलमध्ये तंत्रज्ञान व मीडिया कायदा, मनोरंजन व क्रीडा कायदा, कॉर्पोरेट व आर्थिक कायदा आणि पर्यायी विवाद निराकरण आणि मध्यस्थी आदी विषयांमध्ये विशेष प्राविण्य प्राप्त करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे.